सत्यमेव जयते
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : **ropune@dtemaharashtra.gov.in**

जा.क्र.तंशिविकापु/लले/कार्य.अह/२०२१-२२/२०२२/२९२ दिनांक : १५/०९/२०२२

प्रति,

संचालक/प्राचार्य
शासकीय संस्था, पुणे विभाग.

**विषय - सन २०२१-२२ या कालावधीतील राजपत्रित अधिका-यांच्या महापार प्रणालीवरील प्रलंबित कार्यमुल्यमापन अहवालाची कार्यवाही दि. २२.०९.२०२२ पर्यत पूर्ण करणेबाबत.**

संदर्भ -१. या कार्यालयाचे आदेश क्र. तंशिविकापु/लले/का.अ/२०२२/१४४, दि.१०.०६.२०२२.
२. संचालनालयाचे पत्र क्र. १(२)/गो.अ./२०२२/१३३, दि.२९.०८.२०२२.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिविकापु/लले/कार्य.अह/२०२१-२२/२०२२/२७५, दि.३०.०८.२०२२.
४. संचालनालयाचे पत्र क्र. १(२)/गो.अ./२०२२/१३८, दि. १५.०९.२०२२.

तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांना **गट अ व गट ब (राजपत्रित)** अधिका-यांचे सन २०२१-२२ या प्रतिवेदन वर्षातील कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने दि. ३०.०७.२०२२ पर्यंत सादर करणेबाबत संदर्भ क्र.१ अन्वये सूचित करण्यात आलेले आहे. तसेच सदर प्रणालीत कार्यवाही करताना काही तांत्रिक अडचण उदभवल्यास महापार प्रणालीचे तंत्रज्ञ यांचेशी संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले होते तसेच त्यांचा भ्रमणध्वनी उपलब्ध करुन देण्यात आला होता.

गट अ व ब मधील सर्व अधिका-यांचे कार्यमुल्यमापन अहवाल महापार प्रणालीत ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्याची कार्यवाही पुढील ८ दिवसात पुर्ण करणेबाबत तसेच सदरची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण का करण्यात आली नाही या बाबतचा खुलासा सादर करण्याबात संदर्भ क्र.३ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु खुलासा अद्यापर्यंत अप्राप्त आहे. सदरची कार्यवाही दि. २२.०९.२०२२ पर्यंत न झाल्यास महापार प्रणालीवर कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने भरण्याची कार्यवाही पूर्ण करता येणार नाही, तरी महापार प्रणालीवर ऑनलाईन कार्यमुल्यमापन अहवाल भरण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी. असे संचालनालयाचे संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे.

तरी सर्व संस्थाप्रमुख यांना सूचित करण्यात येते की, महापार प्रणालीवर ऑनलाईन कार्यमुल्यमापन अहवालाची कार्यवाही दि.२१.०९.२०२२ पूर्वी करण्यात यावी व पूर्ण झालेबद्दलचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. विहित मुदतीत आपणाकडून कार्यवाही न झाल्यास याबाबतच्या होणा-या परिणामास संबंधित संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. दत्तात्रय व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे

प्रत-१. सर्व शासकीय संस्थाप्रमुख पुणे विभाग यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.